महाराष्ट्र शासन राजपत्र "भाग-दोन-संकीर्ण सूचना व जाहिराती" या राजपत्राच्या भागामधील प्रकाशित होणाऱ्या खाजगी जाहिराती नागरीकांकडून ऑनलाईन स्विकारणे व ऑनलाईन व ई-मेलव्दारे उपलब्ध करुन देणे..

महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,

शासन निर्णय क्रमांक- न्यायाप्र-२०१५ /प्र.क्र. ५३/उद्योग-४

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक ८ मे , २०१५

वाचा :- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक मातंस-२०११/प्र.क्र. १२५/३९, दिनांक २३ सप्टेंबर, २०११

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक मातंस-२०१२/प्र.क्र. १५२/३९, दिनांक २३/५/२०१२

३) शासन निर्णय, उद्योग व ऊर्जा विभाग, क्रमांक-टीसीएस-२०११/प्र.क्र. १५/११/उद्योग-४, दिनांक ७ जुलै, २०१४

४) मुद्रण व लेखनसामग्री संहिता, परिच्छेद ६.२१

५) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी कंपनी पिटीशन क्रमांक १२४/२०१४ मध्ये दिनांक २४/२/२०१५ व दिनांक २४/४/२०१५ रोजी दिलेले आदेश.

६) संचालक, शासकीय मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक-लेखा/ऑनलाईन गॅझेट/२०१५-१६/१८५/कार्या-८ अ-२, दिनांक ३०/४/२०१५

प्रस्तावना :-

शासकीय मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, मुंबई यांचेमार्फत महाराष्ट्र शासनाचे साधारण व असाधारण अशा ५२ भागांमध्ये राजपत्र छपाई करुन प्रसिध्द केली जात होती. त्यानंतर महाराष्ट्र शासनाची सर्व राजपत्र ई-गॅझेट स्वरुपात इंटरनेटवर उपलब्ध करुन देण्याचा शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक गॅझेट-२०१४/प्र.क्र. ९९/उद्योग-४, दिनांक ९/१२/२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार दिनांक १/२/२०१५ पासून सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयांना व खाजगी जाहिरातदारांना त्यांच्या जाहिराती प्रसिध्द झालेले राजपत्र संचालनालयाच्या www.dgps.maharashtra.gov.in या वेबसाईवर उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. दरम्यानच्या काळात या संदर्भात मोहनलाल बाबुलाल सुतार विरुध्द मे. ग्लोबल इंफ्रास्ट्रक्चर अँड टेक्नॉलॉजी लि.या प्रकरणात कंपनी पिटीशन क्रमांक १२४/२०१४ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक २४/२/२०१५ व दिनांक २४/४/२०१५ रोजी, मुद्रण संचालनालयाने सर्व राजपत्रे ई-गॅझेट स्वरुपात प्रसिध्द करण्यात यावी व त्यासाठी ऑनलाईन अर्ज स्विकारणे आणि ते राजपत्र ऑनलाईन उपलब्ध करुन देणे, ई-मेलव्दारे उपलब्ध करुन देणे इत्यादी प्रक्रिया ऑनलाईन करावी, असे आदेश पारीत केले आहेत. या संदर्भात महाराष्ट्र शासन राजपत्र भाग-दोन मधील नाव, धर्म व जन्मतारीख बदलाबाबतच्या जाहिराती नागरीकांकडून ऑनलाईन स्विकारणे व त्यांना राजपत्र ऑनलाईन उपलब्ध करुन देणे याबाबीस शासनाने

यापुर्वीच दिनांक ७ जुलै, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. आता मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महाराष्ट्र शासन "भाग-दोन-संकीर्ण सूचना व जाहिराती" या राजपत्राच्या भागामधील प्रकाशित होणाऱ्या इतर खाजगी जाहिराती नागरीकांकडून ऑनलाईन स्विकारणे व राजपत्र ऑनलाईन आणि ई-मेलव्दारे उपलब्ध करुन देणेची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय,**

मुद्रण व लेखनसामग्री नियम पुस्तिका परिच्छेद क्रमांक ६.२१ मधील अ. क्र. २ ते ४ येथे नमुद केलेल्या महाराष्ट्र शासन "भाग-दोन-संकीर्ण सूचना व जाहिराती" यामधील सूचना व जाहिराती जसे रोखे, शासकीय वचनपत्रे, बंधपत्रे इत्यादी गहाळ झाल्यासंबंधीच्या नोटीसा, भागीदारीचे विसर्जन, इ. सारख्या केवळ खाजगी सुचना व जाहिराती व नगरपालिका, स्थानिक मंडळे, निमसरकारी संस्था, शासकीय कार्यालये यांच्याकडून मिळणाऱ्या नोटीसा (आकारणीयोग्य नोटीसा) इत्यादी सुविधा नागरीकांना मे. महाऑनलाईन या संस्थेमार्फत ऑनलाईन स्विकारणे व राजपत्र ऑनलाईन व ई-मेलव्दारे उपलब्ध करुन देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र शासन राजपत्र भाग-दोन मधील नाव, धर्म व जन्मतारीख बदलाबाबतच्या जाहिराती नागरीकांकडून ऑनलाईन स्विकारणे व त्यांना ऑनलाईन उपलब्ध करुन देणे याबाबीस शासनाने यापुर्वीच दिनांक ७ जुलै, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. आता सदर राजपत्र अर्जदारास त्यांचे ई-मेलवर देखील उपलब्ध करुन देण्यात यावेत.

३. मे. महाऑनलाईन यांनी महाराष्ट्र शासन राजपत्र भाग-दोन संकीर्ण या संबंधी नागरीकांचे अर्ज ऑनलाईन स्विकारावे व त्यांना राजपत्र ऑनलाईन व ई-मेलवर उपलब्ध करुन द्यावे.

४. सदरच्या सर्व जाहिराती बाबतचे राजपत्र संचालनालयाच्या www.dgps.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

५. वरील कार्यपध्दती दिनांक २१/५/२०१५ पासून सुरु करण्यात यावी.

६. खाजगी जाहिरातीसाठी अर्जदारास शासनाने विहित केलेले जाहिरात शुल्क भरावे लागेल. त्याव्यतिरिक्त या सेवेकरीता मे. महाऑनलाईन यांचे सेवा शुल्क रु. २०/- (सेवाशुल्काव्यतिरिक्त) प्रती अर्ज इतके राहील.

७. सदरच्या जाहिराती महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यासाठी शासनाने विहित केलेल्या शुल्काव्दारे प्राप्त होणारा महसूल मे. महाऑनलाईन लि. यांच्याव्दारे जमा करुन तो NEFT पध्दतीने संबंधित मुद्रणालये व ग्रंथागार यांच्याशी संबंधित लेखाशीर्षामध्ये जमा करण्यात यावे.

८. मुद्रण संचालनालयाने आवश्यकता असल्यास मुद्रण व लेखनसामग्री संहिता, परिच्छेद ६.२१ मध्ये दुरुस्ती करावी.

९. सदरचे आदेश माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या सहमतीने त्यांचेकडील अनौपचारीक संदर्भ क्रमांक ५५७, दिनांक २२/४/२०१५ च्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहेत.

१०. सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१५०५०८१६०२३४७२१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vilaskumar Eknath Gaikwad

Digitally signed by Vilaskumar Eknath Gaikwad
DN: CN = Vilaskumar Eknath Gaikwad, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Industries Energy & Labour
Date: 2015.05.08 16:05:06 +05'30'

**( वि. ए. गायकवाड )**
अवर सचिव
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

**प्रति,**

१) संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई
२) सर्व व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालये, महाराष्ट्र राज्य (संचालनालयामार्फत)
३) सर्व सहायक संचालक, शासकीय लेखनसामग्री भांडारे व ग्रंथागारे (संचालनालयामार्फत)

**प्रतिलिपी**

१) अपर मुख्य सचिव (माहिती व तंत्रज्ञान), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
२) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई
त्यांना विनंती करण्यात येते की, सदर शासन निर्णयास व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.
३) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा) महाराष्ट्र राज्य १/२ मुंबई/नागपूर
४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (३ प्रती)
५) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई (३ प्रती)
६) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
७) सरकारी वकील, मा. उच्च न्यायालय, (मुळ बाजू) पीडब्ल्यूडी इमारत, मुंबई
८) मे. महाऑनलाईन लि. १० वा मजला, गोदरेज कोलिसेम, सोमय्या हॉस्पिटल रोड जवळ, सायन (पुर्व), मुंबई -४०० ०२२
९) निवड नस्ती, उद्योग-४